जनसंपर्क कक्ष

22 FEB 2026 सकाळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनासाठी निधीप्राप्ती ही संशोधकाच्या विश्वासार्हतेची कसोटी

## डॉ. अशोक रायचूर : शिवाजी विद्यापीठात विशेष कार्यशाळा



डॉ. अशोक रायचूर

कोल्हापूर, ता. २१ : 'संशोधनासाठी निधी मिळवणे ही केवळ आर्थिक प्रक्रिया नसून ती संशोधकाच्या कल्पकतेची, विश्वासार्हतेची आणि नियोजनक्षमतेची कसोटी असते,' असे प्रतिपादन इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स येथील शास्त्रज्ञ डॉ. अशोक रायचूर यांनी केले.

भारतातील नवोन्मेषी संशोधन आणि विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने केंद्रीय विज्ञान तंत्रज्ञान मंत्रालयाच्या 'एएनआरएफ-पेअर'च्या हब अँड स्पोक उपक्रमांतर्गत, शिवाजी विद्यापीठ हे बंगळूरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या हबचे स्पोक म्हणून जोडले गेले आहे. यासाठी एएनआरएफ-पेअरच्या माध्यमातूनच ही एकदिवसीय कार्यशाळा झाली. प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी अध्यक्षस्थानी होते. संशोधन प्रकल्पांसाठी निधी मिळवण्याच्या विविध संधी, त्या निधीचा पारदर्शक आणि परिणामकारक वापर तसेच संशोधनातील नैतिकता याविषयी यावेळी माहिती दिली.

प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी म्हणाले, 'आंतरराष्ट्रीय संस्थांकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध आहे. मात्र, त्यासाठी संशोधकांनी दर्जेदार प्रस्ताव तयार करण्याची आणि निधीचा परिणामकारक वापर करण्याची क्षमता विकसित करणे आवश्यक आहे. विद्यापीठ संशोधकांना आवश्यक मार्गदर्शन, सुविधा आणि प्रोत्साहन देण्यासाठी कटिबद्ध आहे.'

तांत्रिक सत्रांमध्ये डॉ. टी. ए. अभिनंदन, डॉ. विक्रम जयराम, डॉ. रोहित कुमार यांनी मार्गदर्शन केले. प्रा. आदित्य सधनाला, आयआयएससी-एसयूके स्पोकचे समन्वयक डॉ. सचिन रॉन्डीया उपस्थित होते.

आयआयएससी-एसयूके स्पोकचे प्रमुख अन्वेषक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी स्वागत केले. डॉ. के. डी. कुचे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. किरण पवार यांनी आभार मानले. यावेळी डॉ. प्रमोद कसबे, डॉ. सुनीलकुमार निर्मळे, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. कविता ओझा, डॉ. कल्याणराव गरडकर उपस्थित होते.

22 FEB 2026

सकाळ

# अकौंटन्सी म्युझियम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान

## हरगुडे : अकौंटन्सी म्युझियम ऑफ इंडियाचे उद्‌घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २१ : 'अकौंटन्सी म्युझियम' विद्यार्थ्यांसाठी लेखाशास्त्राच्या प्रवासाचे प्रेरणास्थान ठरेल,' असे प्रतिपादन कोल्हापूर शाखेचे अध्यक्ष सीए नितीन हरगुडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग, आयसीएआय कोल्हापूर शाखेतर्फे अकौंटन्सी म्युझियम ऑफ इंडियाचे उद्‌घाटन कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी यांच्या हस्ते झाले. यावेळी सचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन, कोल्हापूर शाखेचे उपाध्यक्ष सीए आशीष सेवेकरी, सचिव अलोक शाह, खजानीस राघवेन्द्र बकरे, सदस्य प्रीती पाचोरे, सतीश डकरे उपस्थित होते.

श्री. हरगुडे म्हणाले, 'युनिव्हर्सिटीचा माजी विद्यार्थी म्हणून या ऐतिहासिक उपक्रमाचा साक्षीदार होणे माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. हे म्युझियम भावी पिढ्यांना आणि फायनान्स क्षेत्रात करिअर करण्यास प्रेरणा देईल.'

कुलगुरू प्रा. गोसावी म्हणाले, 'सुमारे १४०० वर्षांपूर्वी दुहेरी नोंद पद्धतीची संकल्पना उदयास आली आणि त्यानंतर लेखाशास्त्राचा विकास सातत्याने होत राहिला. लेखाशास्त्राचा हा समृद्ध इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर उभारलेले हे अकौंटन्सी म्युझियम विद्यार्थ्यांना लेखाशास्त्राचा उगम, प्रवास आणि आधुनिक स्वरूप यांची माहिती करून देईल. या संग्रहालयामुळे विद्यार्थ्यांमध्ये विषयाविषयी अभिमान, जाणीव आणि समज निर्माण होईल.'

डॉ. महाजन यांनी कुलगुरू आणि श्री. हरगुडे यांनी घेतलेल्या उपक्रमाबद्दल आभार व्यक्त केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना लेखाशास्त्राच्या इतिहासाची आणि विकासाची माहिती मिळेल, असे त्यांनी नमूद केले. प्रा. केदार मारुलकर यांनी आभार मानले. शाखा व्यवस्थापक स्वप्नील सादळे, व्यवस्थापकीय समितीने नियोजन केले.

2 2 FEB 2026

पुण्यनगरी



# शिवाजी विद्यापीठात तबलावादन कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित दोनदिवसीय तबलावादन कार्यशाळा उत्साहात झाली. यात न्यू जर्सी (अमेरिका) येथील सूर्याक्ष देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. प्रसिद्ध तबलावादक पं. अरविंद मुळगावकर यांचे ते शिष्य आहेत. कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी देशपांडे यांनी विद्यार्थ्यांकडून काही मूलभूत बोलपंक्तींचा सराव करून घेतला. त्यानंतर तीनताल, झपताल व मत्तताल यांमधील कायदे, रेला, रौ, लडी या संकल्पना सोदाहरण स्पष्ट केल्या. दुसऱ्या सत्रात तिहाईचे विविध प्रकार, तिहाई तयार करण्याची सूत्रे व त्यामागील विचारप्रक्रिया यांवर प्रकाश टाकला. दुसऱ्या दिवशीच्या सत्रात त्यांनी 'कंठसंगीताची साथसंगत' या विषयावर गायन व तबल्याच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. देशपांडे यांच्या एकल तबलावादनाने कार्यशाळेची सांगता झाली. या वादनासाठी नगमा साथ अमित साळोखे यांनी केली. पं. सुधीर पोटे, पं. विनोद डिग्रजकर, डॉ. नंदकुमार जोशी, महेश देसाई, संदीप तावरे आदी उपस्थित होते. स्वागत अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले. अतुल परीट यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. गिरीधर कुलकर्णी व प्रशांत देसाई यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

22 FEB 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज राज्यस्तरीय नोकरी महामेळावा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती रोजगार कक्ष, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाऊंडेशन आणि विद्यापीठ विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २२) विद्यापीठात राज्यस्तरीय नोकरी महामेळावा आयोजित केला आहे. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते सकाळी १० वाजता मेळाव्याचे उद्घाटन होणार आहे. याप्रसंगी माहिती, तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

मेळाव्यात १२५ पेक्षा अधिक नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील आघाडीच्या कंपन्यांचा समावेश आहे. मेळाव्यास १० हजार युवक- युवती उपस्थित राहणार आहेत. महामेळाव्यात विविध क्षेत्रांतील एकूण ८ हजार जागा भरतीसाठी उपलब्ध आहेत. आठवीपासून पीएच.डी.पर्यंत अशी कोणत्याही प्रकारची शैक्षणिक



शिवाजी विद्यापीठातून

पात्रता धारण केलेल्या, अनुभवी तसेच सर्व प्रकारच्या अभ्यासक्रमांना प्रवेशित अंतिम वर्षात शिक्षण घेणारे विद्यार्थी यांच्यासाठी नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

विद्यापीठाने २५ अधिविभागांमध्ये ७५ मुलाखत कक्षांची उपलब्धता केली आहे. एकाच वेळी तेथे १५० उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत. उमेदवारांच्या सोयीसाठी विद्यापीठाच्या प्रत्येक प्रवेशद्वारासह प्रत्येक अधिविभागाच्या ठिकाणीही कंपन्यांची नावे व मुलाखतीची ठिकाणे यांची माहिती असणारे फलक लावण्यात येतील. एका उमेदवाराला जास्तीत जास्त तीन कंपन्यांसाठी मुलाखती देता येऊ शकतील.

22 FEB 2026

लोकसत्ता

# 'नवतंत्रज्ञानाधारित उत्पादन क्षेत्राकडे भारताची वाटचाल'

**कोल्हापूर :** यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात देशाने विज्ञानाधारित उत्पादन क्षेत्राकडे लक्ष केंद्रित केल्याचे स्पष्ट होत आहे. संगणक क्षेत्राच्या पुढे जाऊन आता नव्या तंत्रज्ञानावर आधारित उत्पादन उद्योग विकसित होण्याच्या दिशेने भारताच्या विज्ञान क्षेत्राची वाटचाल सुरू आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. प्रकाश पवार यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या नेहरू अभ्यास केंद्रातर्फे आज 'प्रा. नरहर विष्णू कारेकर व्याख्यानमाले' अंतर्गत डॉ. पवार यांचे 'भारताचे विज्ञान धोरण' या विषयावर व्याख्यान झाले, त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख होते.

ते म्हणाले, भारताच्या वैज्ञानिक वाटचालीविषयी डॉ. पवार यांनी भारतीय ज्ञानपरंपरेचा अत्यंत साकल्याने वेध घेतला. जास्त लोकसंख्या असलेल्या देशाचा प्राधान्यक्रम रोजगारनिर्मिती असतो. अशा स्वावलंबी मनुष्यबळाच्या विकासामधूनच देशाची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल सुकर होणार आहे.

22 FEB 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आज नोकरी महामेळावा

## ८ हजार जागांच्या भरतीसाठी मुलाखती : २५ अधिविभागांमध्ये ७५ मुलाखत कक्षांची उपलब्धता

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती रोजगार कक्ष, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाऊंडेशन आणि विद्यापीठ विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी २२ रोजी विद्यापीठात राज्यस्तरीय नोकरी महामेळावा आयोजित केला आहे. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते सकाळी १० वाजता या महामेळाव्याचे उद्‌घाटन करण्यात येणार आहे. यावेळी माहिती व तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांची प्रमुख उपस्थिती असेल, अशी माहिती विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या की, या महामेळाव्यात १२५ हून अधिक नामांकित राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा सहभाग निश्चित झाला असून साधारण १०,००० युवक, युवती उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.

अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वाणिज्य, विज्ञान, कला, कायदा, फार्मा, नर्सिंग तसेच इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना थेट मुलाखतीद्वारे रोजगार संधी उपलब्ध होणार आहेत. पत्रकार परिषदेस कुलसचिव डॉ. विलास शिंदे, मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. सुभाष कोंबडे आणि विद्यापीठ विकास मंचचे स्वागत परुळेकर होते.




- नोकरी महामेळाव्याचे स्थळः शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- दिनांकः रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६
- वेळः सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत

- **१२५ पेक्षा अधिक नामांकित कंपन्यांचा सहभाग**
- **विद्यापीठाच्या वेबसाईटवरील लिंकद्वारे ४५०० उमेदवारांची नोंदणी**
- **एकाच वेळी १५० उमेदवारांच्या मुलाखती घेता येणार**

### ८००० जागांच्या भरतीसाठी मुलाखती

नोकरी महामेळाव्यात विविध क्षेत्रांतील एकूण ८००० जागा (व्हॅकन्सी) भरतीसाठी उपलब्धअसून आठवीपासून पीएचडीपर्यंत अशी कोणत्याही प्रकारची शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या, अनुभवी तसेच सर्व प्रकारच्या अभ्यासक्रमांना प्रवेशित अंतिम वर्षात शिक्षण घेणारे विद्यार्थी यांच्यासाठी नोकरीच्या संधी उपलब्ध असतील. विद्यापीठाने २५ अधिविभागांमध्ये ७५ मुलाखत कक्षांची उपलब्धता केली असून एकाच वेळी तेथे १५० उमेदवारांच्या मुलाखती घेता येणार आहेत. एका उमेदवाराला जास्तीत जास्त तीन कंपन्यांसाठी मुलाखती देता येऊ शकतील. तशा प्रकारचा नोंदणी अर्ज उमेदवारांनी उपस्थित झाल्यानंतर भरून द्यावयाचा आहे.

22 FEB 2026

पुढारी

# म. सु. पाटील यांचा 'समीक्षाविचार' या विषयावर मंगळवारी चर्चासत्र, पुरस्कार वितरण समारंभ



शिवाजी विद्यापीठातून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ मराठी विभाग व नव-अनुष्टुभ परिवार, प्रतिष्ठान, येवला (नाशिक) यांच्या वतीने दि. २४ फेब्रुवारी रोजी 'डॉ. म. सु. पाटील यांचा 'समीक्षाविचार' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. चर्चासत्र विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृह येथे सकाळी ११ ते ५ या वेळेत होणार आहे. चर्चासत्राचे बीजभाषण प्राचार्य डॉ. दिलीप धोंगडे करणार आहेत. यात गणेश कनाटे, आशुतोष पाटील, नंदकुमार मोरे, वीरधवल परब म. सु. पाटील यांचा समीक्षाविचार केंद्रस्थानी ठेवून मांडणी करणार आहेत. सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. एकनाथ पगार, डॉ. प्रतिभा कणेकर असणार आहेत. दुपारी ४ वाजता ज्येष्ठ समीक्षक प्रा. चंद्रकांत पाटील यांना, 'डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार' ज्येष्ठ लेखक डॉ. राजन गवस यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. डॉ. पाटील यांच्या कन्या-मराठीतील सुप्रसिद्ध लेखिका नीरजा प्रमुख उपस्थितीत राहणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे असणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

2 2 FEB 2026

तरुण भारत

# विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ वर्षातील मार्च, एप्रिल महिन्यातील उन्हाळी सत्रामध्ये होणाऱ्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. मार्च-एप्रिल, २०२६ उन्हाळी सत्रातील परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा विद्यापीठाकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. तथापि काही महाविद्यालयाकडून परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखांना मुदतवाढ मिळण्याबाबत विद्यापीठाकडे विनंती करण्यात आली होती. त्या विनंतीचा गांभिर्याने विचार करून विद्यार्थीच्या हितास्तव परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखामध्ये मुदतवाढ देण्यात आली असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.